MAH/MUL/ 03051/2012 ISSN :2319 9318

आंतरविद्याशाखीय बहुभाषिक शोध पत्रिका

विद्यावार्ता™

# Special Issue

Sarvoday Shikshan Sanstha's

**Arts, Commerce and Science College, Kowad.**

Tal. Chandgad, Dist. Kolhapur (Maharashtra) – 416508

(Affiliated to Shivaji University, Kolhapur)

Re-accredited by NAAC 'B+'

Email : kowad2.cl@unishivaji.ac.in Web : www.acscollegekowad.com

One day National Online Webinar on

**Dr. Babasaheb Ambedkar's Human Rights, Socio-Economic and Political Thoughts**

Date : 10/04/2022, Day : Sunday

Organized by NSS and Sociology Department under the aegis of IQAC.

**Dr. Khanderavaji S. Kale**
**Cordinator**

**Dr. V. K. Dalvi**
**Co- coordinator**

**Dr. M. S. Gholse**
**Hosting**

ARTS, COMMERCE & SCIENCE COLLEGE, GADHINGLAJ Reg.No. 2/12883 Estd. June - 1998 Tal.Gadhinglaj, Dist.Kolhapur.

❖ **विद्यावार्ता** या आंतरविद्याशाखीय बहुभाषिक त्रैमासिकात व्यक्त झालेल्या मतांशी मालक, प्रकाशक, मुद्रक, संपादक सहमत असतीलच असे नाही. **न्यायक्षेत्र:बीड**

"Printed by: **Harshwardhan Publication Pvt.Ltd.** Published by **Ghodke Archana Rajendra** & Printed & published at Harshwardhan Publication Pvt.Ltd.,At.Post. Limbaganesh Dist,Beed -431122 (Maharashtra) and Editor **Dr. Gholap Bapu Ganpat**.

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205
Harshwardhan Publication Pvt.Ltd.
At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed
Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295
harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com
All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com

27) DR.BABASAHEB AMBEDKAR'S HISTORIC CONTRIBUTION TO SOCIAL, ...
**DR. DHALE GAUTAM NAMDEV, Jaysingpur** ||122

28) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आदर्श शैक्षणिक धोरण
**Dr. Madhukar Vithoba Jadhav, Prof.V.V.Kolkar, Dist-Kolhapur** ||128

29) डॉ. बाबासाहेब आंबेडकर और समकालीन हिंदी कविता
**डॉ. जहीरुद्दिन रफियोद्दिन पठान, जि. नांदेड** ||132

30) डॉ.बाबासाहेब आंबेडकर व शिक्षण
**प्रा.डॉ.सुरेश मारूती चव्हाण, जि.कोल्हापूर —महाराष्ट्र** ||136

31) Dr.Babasaheb Ambedkar Role for Women emancipation and Empowerment
**Dr. Rita Malache, Mumbai** ||139

32) आधुनिक भारताचे निर्माते अर्थतज्ञ डॉ. बाबासाहेब आंबेडकर
**डॉ. काशिनाथ रामचंद्र तनंगे, गडहिंग्लज** ||148

33) डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी अस्पृश्य वर्गासाठी केलेले कार्य
**विजय तुकाराम हराळ, पुणे** ||154

34) डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे सामाजिक व शैक्षणिक कार्ये
**प्रा.बनसोडे एस.एस., जि.कोल्हापूर** ||157

35) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या आर्थिक विचारांची मौलिकता
**प्रा. डॉ. संजीव सुखलाल बोडखे, जि. सातारा** ||160

36) डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि विविध सत्याग्रह
**प्रा. शिंदे ज्योती, पुणे** ||163

37) डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि बौद्ध धम्म
**प्रा.डॉ.जाधव दिलीप रामचंद्रराव, जि.नांदेड** ||167

38) डॉ.बाबासाहेब आंबेडकर : महिला सशक्तिकरण
**डॉ.संजीवनी संदीप पाटील, गडहिंग्लज** ||169

39) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कृषी विषयक विचार
**प्रा. डॉ. महेंद्र बापू जाधव, प्रा. श्री. सचिन सोमगोंडा पाटील, गडहिंग्लज** ||172

40) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्त्रियांबद्दलचे कार्य
**डॉ. नामदेव एम. हटवार, सालेकसा** ||175



www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com

ARTS, COMMERCE & SCIENCE COLLEGE
Reg.No. 2/12883
Estd. June - 1998
Tal.Gadhinglaj, Dist.Kolhapur.
GADHINGLAJ

**निष्कर्ष** — भारत में जब फेमिनिज्म यानी नारीवाद का कोई नाम भी ढंग से नहीं जानता था, उस वक्त डॉ. बाबासाहब आंबेडकर ने नारी सशक्तिकरण के ऐसे कई काम किए जिससे आज भारतीय महिलाएं अंतरिक्ष तक पहुंच चुकी हैं। सर्वत्र संपूर्ण शिक्षा,शिक्षित होकर निर्णय लेने की क्षमता का विकास,राजनीति मुक्त नारी संगठन,आर्थिक स्वावलंबन आदि के कारण आज की नारी हर क्षेत्र में आगे बढ रही है।भारत जब अंग्रेजों की हुकुमत में था तब भी डॉ.राजा राममोहन राय, महर्षि कर्वे, महात्मा फुले ने महिलाओं को उनके अधिकार देने की कोशिश की और उन्हें उनके अधिकार दिए। जबकि डॉ. बाबासाहेब आंबेडकर ने संवैधानिक प्रावधानों के माध्यम से महिलाओं के अधिकारों को कानूनी संरक्षण प्रदान किया। महिलाओं के अधिकारों के प्रति डॉ. बाबासाहेब का नजरिया आज भी समाज के लिए मार्गदर्शक है। डॉ.बाबासाहेब आंबेडकर जी के जीवन में महिलाओं की प्रगति और विकास का कितना महत्व था यह उनके इस कथन से स्पष्ट होता है,'अगर हम किसी समाज की प्रगति को मापना चाहते हैं, तो मैं उस समाज में महिलाओं की प्रगति को मापता हूं।केवल महिलाओं की उन्नति से देश की प्रगति को नापा जा सकता है। यह सत्य जाननेवाले महामानव डॉ.बाबासाहब आंबेडकर जी ही थे। आज हम सभी महिलाएं हर क्षेत्र में काम कर सकती है इसका श्रेय केवल बाबासाहब जी को ही जाता है।

**संदर्भ** —

१. शास्त्री सोहनलाल विद्यावाचस्पति,हिंदू कोड बिल और डॉ, अम्बेडकर,सम्यक प्रकाशन, दिल्ली, २००९, पृ.४९

२. बाली.एस.आर,डॉ.अम्बेड्कर और हिंदू कोड बिल,भीम पत्रिका पब्लिकेशन,जालंधर,१९८३,पृ.५

३. बाली.एस.आर,अम्बेडकर ने क्या किया? भीम पत्रिका पब्लिकेशन,जालंधर,१९९१,पृ.१८६

४. कीर धनंजय,डॉ.बाबासाहेब अम्बेडकर जीवन चरित्र(अनु.गजानन सुर्वे),पाप्युलर प्रकाशन,दिल्ली,१९९६, पृ.३९६—३९७

५. खरे विजय,डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि राष्ट्रीय सुरक्षा,सुगावा प्रकाशन,पुणे २०१०

६. सं.ब्रिजेश सिंह,आपला आदर्श,आपली प्रेरणा महामानव,शासकीय फोटोझिंको मुद्रणालय,पुणे२०१७

७. https://www.amarujala.com

**39**

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कृषी विषयक विचार

**प्रा. डॉ. महेंद्र बापू जाधव**
कला, वाणिज्ये व विज्ञान महाविद्यालय, गडहिंग्लज

**प्रा. श्री. सचिन सोमगोंडा पाटील**
कला, वाणिज्ये व विज्ञान महाविद्यालय, गडहिंग्लज

**********

**प्रस्तावना** —

भारत हा कृषी प्रधान देश आहे. सुरुवातीच्या काळापासूनच भारतीय लोकांचा प्रमुख व्यवसाय शेती हाच राहिलेला आहे. प्राचीन काळात विशेषता : वैदिक काळात वैश्य वर्णीयांकडे व्यापार व कृषी विषयक कार्य सोपवलेले दिसून येते. प्राचीन — मध्ययुग व ब्रिटीश काळात शासन व्यवस्थेच्या उत्पन्नाचे प्रमुख मार्ग जमीन महसूल हेच होत. त्यामुळे बहुतांश राज्यकर्त्यांनी अतिरिक्त शेतसारा भारतीय जनतेकडून वसूल केल्याचे आढळते. त्यामुळे भारतीय शेती व शेतकरी यांची दैन्यावस्था झाल्याचे दिसून येते. भारतीय शेती व शेतकऱ्यांच्या हितासाठी मूलगामी योजना आखून त्या प्रत्यक्ष कृतीत आणण्याचे कार्य करणाऱ्यांमध्ये डॉ. आंबेडकर यांचे स्थान अग्रभागी आहे. भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, अर्थशास्त्रज्ञ, शिक्षणतज्ज्ञ, राजनीतिज्ञ, दलितांचे कैवारी, व आधुनिक भारताचे राष्ट्र निर्माते एक प्रखर बुद्धिप्रामाण्यवादी व कृतीशील विचारवंत म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना ओळखले जाते. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी भारताचा इतिहास, समाजशास्त्र, धर्मशास्त्र, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, व संस्कृती यांची बुद्धिप्रामाण्यवादी भूमिकेतून पुनर्मांडणी केली. सदर शोधनिबंधात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या कृषीविषयक विचारांचा, त्यांनी कृषी विकासासाठी



ARTS, COMMERCE & SCIENCE COLLEGE, GADHINGLAJ
Reg.No. 2/12883
Estd. June - 1998
Tal.Gadhinglaj, Dist.Kolhapur.

केलेल्या उपाय योजनांचा व धोरणांचा ऐतिहासिक दृष्टीकोनातून विश्लेषण करण्याचा प्रयत्न आम्हीं केलेला आहे

**संशोधन पध्दिती —**

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे कृषी विषयक विचारहा संशोधनपरलेख मांडताना आम्हीध सर्वसाधारण दुय्यम पध्दधतीचा अभ्यांस केला आहे. त्यांसाठी यांची देनिक पेपरमधील लेख व वेगवेगळी पुस्ततके वापरून हया लेखाची मांडणी केली आहे.

**डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे जीवन परिचय—**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जन्म १४ एप्रिल १८१६ रोजी मध्यप्रदेशातील महू या गावी घ झाला.भीमाबाई व रामजी हे त्यांचे माता — पिता होते. अस्पृशता निवारणाच्या कार्याबरोबरच त्यांनी शेतकरी कष्टकरी, कामगार यांच्या शोषणाच्या विरोधात देखील अनेक चळवळी केल्या. सामाजिक सुधारणा चळवळी बरोबरच समाज प्रबोधनासाठी मूकनायक (३० जानेवारी १६२०), 'बहिष्कृत भारत' (३ एप्रिल १६२७), 'जनता' ( १६३०) प्रबुद्ध भारत ' (४ फेब्रुवारी १६५४) अशा वृत्तपत्रांचा अवलंब केला, शास्त्रीयदृष्टया सर्व धर्म व धर्मग्रंथ यांची अभ्या स करून केले. त्यातून मानवता व समतेवर आधारित आधुनिक भारताच्या निर्मितीचा पाया घातला.

**डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे कृषी विषयक दृष्टिकोन**

**१. शेतीचे विभागीकरणाच्याा समस्या व उपाय**

इ.स. १६६८ मध्ये डॉ . आंबेडकरांनी भारतातील शेती क्षेत्रासमोरील समस्यांचे मूलगामी विश्लेषण Small Holdings in India and their remedies या शोध निबंधात केले. भारतामध्ये वाढती लोकसंख्या व त्यामुळे शेतीचे तुकडीकरण होऊन धारणा क्षेत्र लहान बनल्यामुळे जमीन मोठया प्रमाणात पडीक झालेले आहे. त्याचा परिणाम भारतात बेरोजगारी वाढून अन्नधान्य उत्पादन घटण्यात झाला. त्यामुळे भारताचे राष्ट्रीय उत्पन्न घटले व दारिद्रं वाढले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय शेतीच्या या तुकडी करणावर उपाय त्यांनी सांगितलेला आहे.ते म्हणतात शेतकर्यानी आपली मुले शेतीवर अवलंबून न ठेवता त्यांना व्यापार, उद्योग, व शिक्षण क्षेत्रात घातले पाहिजे त्यामुळे शेतीवरचा बोजा कमी होईल. ग्रामीण भागात विखुरलेला समाज एकसंघ करायचा तर शेतीचे चित्र बदलले पाहिजे. याबाबत डॉ. बाबासाहेब आंबेडकर ठाम होते. भारतीय शेतीची उत्पादकता व कसदारपणा अमेरीका देशातील शेतीच्या तुलनेत कमी आहे. भारतीय शेतीचे उत्पादन वाढविण्याचा मार्ग हा जमिनीचे आकारमान वाढविणे हा नसून असलेल्या शेतजमिनीत मोठया प्रमाणात भांडवल, मनुष्यबळ व प्रभावी तंत्रज्ञानाचा वापर करून उत्पन्न वाढविणे 'हा आहे.शेतीच्या सलगीकरणासाठी व उत्पादकता वाढविण्यासाठी सहकारी शेती हा उत्तकम मार्ग आहे.

**२. शेतकरी आणि स्वतंत्र मजूर पक्ष —**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्वतंत्र मजूर पक्षातर्फे मुंबई विधिमंडळात जमीन मालक असणाऱ्या खोतान विरोधात विधेयक मांडून जनआंदोलन उभारले होते त्याचा परिणाम कुळ कायदा मंजूर करण्यात आला शेती हे केवळ उपजीविकेचे साधन नसून राष्ट्रीय उत्पन्नाचा एक स्त्रोत आहे ग्रामीण भारताच्या विकासाचा शेती हा आर्थिक केंद्रबिंदू आहे शेतकऱ्यांबरोबरच अनेक शेतमजुरांना रोजगार पुरवण्याचे काम शेतीतून होत असते त्यामुळे शेतीकडे एक उद्योग म्हणून पाहिले पाहिजे सरकार कडून पुरेसे आर्थिक पाठबळ मिळत नसल्या कारणाने शेतकऱ्यांना सावकाराकडून ज्यादा व्याजदराने कर्जे घ्यावी लागतात त्यातून त्यांची शेवटपर्यंत सुटका होत नाही सावकर व खोत यांना उद्देश इन ते म्हणतात की आयत्या बिळावर चे नागोबा आर्थिक विषमता ही जातीय व्यवस्थेला पूरक व पोषक ठरते त्यामुळे आर्थिक विषमतेची दरी कमी करण्यात शेती उद्योग महत्त्वाचे योगदान देईल असा विश्वास ते व्यक्त करतात शासनाने पीक पद्धती पिण्याची उपलब्धता बांधबंदिस्ती साठवण व्यवस्था शेतमालाची विक्री शेतमालाची किंमत याबाबत पष्ट नियम करावेत अशी भूमिका डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मांडली आहे जलसंधारण विकासासाठी पिण्यासाठी शेतीसाठी जलवाहतूक वीज निर्मिती व काही उद्योगांसाठी अशा सिंचन योजनांचा बहुउद्देशीय दृष्टीकोण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा होता.



ARTS, COMMERCE & SCIENCE COLLEGE GADHINGLAJ
Reg.No. 2/12883
Estd. June - 1998
Tal.Gadhinglaj. Dist.Kolhapur.

भारतीय अर्थव्यवस्था पूर्णत: शेतीवर अवलंबून आहे तसेच मोठा भुमिहिन श्रमिक वर्गही भारतामध्ये आहे तेव्हा ही सगळी श्रमिक ऊर्जा शेती कडून उद्योगाकडे वळवायला हवी याचे ही बाबासाहेबांनी जोरदार समर्थन केले आहे डॉ. आंबेडकरांनीही औद्योगिकरण आणि आधुनिक आर्थिक विकासाची योग्य सांगड घातली होती व औद्योगीकरण अधिक गतिमान व्हावे या मताचा पुरस्कार केला होता अतिरिक्त श्रमिक उद्योग व्यवसायाकडे कळवल्यास शेत जमिनीवर अवलंबून असलेले आर्थिक अधिभार ही कमी होतील भारतीय शेतकऱ्यांनी व विकासासाठी जातीपाती सोडून शेतकरी म्हणून एकत्रित यावे व संघटित व्हावे असा मूलमंत्र देणारे शेतकऱ्यांचे कैवारी म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्य महत्त्वाचे आहे.

**३. जमीन महसूल व आयकर यातील फरक**

शेतीतून मिळणारे उत्पन्न अवर्षणामुळे कमी झाले किंवा भरघोस उत्पन्न झाल्यामुळे प्रत्येक शेतकऱ्याला आपल्या जमिनीच्या प्रमाणात महसूल भरावात लागतो त्यातून सर्व शेतकऱ्यांना शेतसाऱ्या चा एकच दर लागू होतो मग तो अल्पभूधारक असो किंवा मोठा जमीनदार असो मात्र याउलट आयकर हा करत्याच्या देयक क्षमतेवर अवलंबून असतो एखाद्या व्यक्तीला त्या वर्षात विशिष्ट मर्यादेपेक्षा कमी उत्पन्न झाले तर त्या व्यक्तीचा आयकर कमी केला जात होता शेतकऱ्या बाबत मात्र असा काही ठरावीक नियम नसल्याचे कारणाने जमीन महसुलाच्या माध्यमातून शेतकऱ्यांचे मोठे शोषण होते म्हणून महसूल व्यवस्था आर्थिक विषमतेला कारणीभूत ठरत आहे म्हणून कर भरणीच्या माध्यमातून येणाऱ्या पैशाचा उपयोग शेतकर्यांना कर्ज मुक्त करण्यासाठी केला पाहिजे अशी भूमिका डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात.

**४. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे जलनीती धोरण**

डॉ. आंबेडकर, १९४२ ते १९४६ या काळात केंद्रीय पाटबंधारे खात्याचे मंत्री असताना कृषी विकासासाठी कायमस्वरुपी पाणी पुरवठा करण्यासाठी देशातील मोठ्य नद्या जोडण्याचा विचार मांडून भाकरा नांगल प्रकल्पाची पायाभरणी केली त्यासाठी अमेरिकेतील युनायटेड स्टेटस रेक्लमेशन च्या तज्ञ इंजिनियर यांची मदत घेतली या धरणाची उंची ४८७ पॉईंट ६८ मीटर एवढी करून जास्तीत जास्त जलसाठा वाढवला त्याचा फायदा देशात हरित क्रांती करण्यासाठी झाला कृष्णा गोदावरी आणि तापी च पाणी समुद्रात वाया जाऊ नये आणि या नद्या एकमेकांना जोडल्या जाव्यात असेही मत डॉ. आंबेडकरांनी मांडले होते त्याच बरोबर दामोदर गंगा महानदी जोशी व ब्रह्मपुत्रा या नद्यांवर धरणे बांधण्याचा व वीज निर्मितीचा प्रकल्प हाती घेतला आज राज्यामध्ये व देशातही पाणी व वीज टंचाईची वन वन करावी लागत आहे याबाबत डॉक्टर आंबेडकरांची दूरदृष्टी महत्त्वाची मानली पाहिजे.

**५. शेतीसाठी ऊर्जास्त्रोत उभारणीत योगदान**

डॉ. आंबेडकर यांनी केंद्रीय जल आयोग च्या निर्मितीत महत्त्वाची भूमिका मांडलेली दिसून येते केंद्रसरकारने विद्युत निर्मिती आणि कायमस्वरूपी विद्युत पुरवठा या क्षेत्रात सहभागी होण्याचा पर्याय असावा याबाबत डॉ. बाबासाहेब आंबेडकर आग्रही होते भारताच्या कृषी व औद्योगिक विकासासाठी स्वस्त आणि कायमस्वरूपी विद्युत पुरवठा ची गरज त्यांनी व्यक्त केली होती त्यासाठी केंद्र सरकारने ऊर्जा प्रकल्प राबवावेत अशी भूमिका वेळोवेळी आपल्या भाषणातून व लेखनातून केली ती आजही शेतीसाठी समर्थ ठरत आहे औद्योगिक क्रांती साठी देखील शेतमालाची आवश्यकता असते त्यामुळे सरकारने कृषी विषयक धोरण आंकडे विशेष लक्ष देऊन स्थलांतरितांचा प्रश्न सोडवला पाहिजे त्यांचा हा विचार आजच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेला एक ठराविक दिशा देणारा आहे यावरून त्यांचे दूरदृष्टीचे महत्त्व लक्षात येते.

**निष्कर्ष व उपाययोजन —**

डॉ. आंबेडकर हे भारताच्या आर्थिक नियोजनाचे आणि आर्थिक विकासात्मक धोरणाचे ही शिल्पकार होते. त्यांना भारतीय कृषी व्यवस्थेची देखील चांगली जाणीव होती. सामूहीक शेतीचे ते पुरस्कर्ते होते भारतासारख्या कृषिप्रधान देशात पाणी आणि विज यांचा कायमस्वरूपी पुरवठा झाला तर भारत एक समृद्ध देश होण्यास वेळ लागणार नाही असे बाबासाहेबांचे मत होते. खोत पद्धत ही एक प्रकारची शेतकऱ्यांचे



ARTS, COMMERCE & SCIENCE COLLEGE Reg. No. 2/12883 Estd. June - 1998 Tal. Gadhinglaj. Dist. Kolhapur. GADHINGLAJ

I/C. PRINCIPAL
Arts, Commerce & Science College
Gadhinglaj, Dist. Kolhapur.